# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 17 January 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १७ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०

****

- देशातल्या पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ
- युवकांना परदेशात रोजगार संधीसाठी आंतरराष्ट्रीय गतीशीलता आणि क्षमता संस्था स्थापनेचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात – काँग्रेसची मागणी

आणि

- जिल्हा परिषद निवडणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासन सज्ज

****

देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. ही रेल्वे मालदा रेल्वे स्थानकातून हावडा, गुवाहाटी आणि कामाख्या दरम्यान धावणार आहे. यावेळी केलेल्या भाषणात पंतप्रधान म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

राज्यातल्या युवकांना परदेशात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशीलता आणि क्षमता संस्था स्थापन करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मुंबईत नागरी परिवहन प्रकल्प टप्पा दोनसाठीच्या सुधारित खर्चालाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. शिवडी न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकर शुल्काला आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला. मुंबई शहर आणि उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थानं बांधायला मंत्रिमंडळाने आजच्या बैठकीत मंजुरी दिली.

राज्यातील भाजीपाला निर्यातीसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव इथं मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषी पणन महामंडळाला ७ हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी रुपयांच्या निधीला आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी वल्सा नायर – सिंग यांना आज महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली सह्याद्री अतिथीगृहात एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना ही शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केलं. या कार्यक्रमाला ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह ऊर्जा विभागातील अधिकारी उपस्थित होते.

****

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज कोपरखैरणे इथं सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचं अभिनंदन करत त्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी बोलताना त्यांनी, पुढील काळात विकासात्मक धोरणावर भर दिला जाईल असं सांगितलं.

****

भारतीय जनता पक्षानं कागदावरती शिवसेना संपवली असेल, पण जमिनीवरची शिवसेना ते संपवू शकत नाहीत, असं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. ते आज, मुंबई तसंच राज्यातील इतर महापालिका निकालांबाबत झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. मुंबई

महापालिकेत ६५ उमेदवार निवडून आल्याबद्दल त्यांनी यावेळी मुंबईकरांचे आभार मानले.

****

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. यासंदर्भात पटोले यांनी, राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. नुकत्याच झालेल्या मनपा निवडणुकीत मतदानाची घसरलेली टक्केवारी ही, निवडणूक प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वास कमी होत असल्याचं निर्दशक असल्याची टीका पटोले यांनी या पत्रात केली आहे.

****

पुणे महानगरपालिकेतल्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे दोन्ही पक्ष आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्रितपणे लढवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पुण्यात ही माहिती दिली. महानगरपालिका निवडणुकीतील पराभवाचं आत्मचिंतन करून दोन्ही पक्ष नव्या दमानं पुढे जातील, असं शिंदे यांनी सांगितलं.

****

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणातून सक्षम आणि सृजनशील भारत घडेल असा विश्वास राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. हे विद्यापीठ देशातील नवशिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारं अग्रगण्य विद्यापीठ असून न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसंच स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या महान विभूतींनी इथं शिक्षण घेतलं, याकडे पाटील यांनी लक्ष वेधलं. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विभागप्रमुख, प्राध्यापक तसंच विद्यार्थी उपस्थित होते. या दीक्षान्त समारंभात पदवी आणि पदव्युत्तर मिळून विविध विद्याशाखांतील १ लाख ७२ हजार ५२२ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद निवडणुकीत सुमारे पावणे एकोणीस लाख मतदार मतदान करणार असून, यासाठी दोन हजार दोनशेहून अधिक मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पत्रकार परिषदेत याबाबत अधिक माहिती दिली, ते म्हणाले..

**बाईट – जिल्हाधिकारी दिलीप स्वामी**

****

बीड इथल्या श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना–NCC च्या दोन कॅडेड्सची भारतीय नौसेनेत निवड झाली आहे. सुदीप अर्जुन राहिंज आणि कपिल रामकृष्ण नागरगोजे असं या विद्यार्थ्यांचं नाव आहे. महाविद्यालयाच्या वतीने या दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शेतकरी कुटुंबातल्या या दोन्ही मुलांनी आर्थिक अडचणींवर मात करून हे यश मिळवल्याबद्दल त्यांचं कौतुक होत आहे.

****

धनगर समुदायाचा समावेश अनुसूचित जमातीत करायच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यात होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. आज शहर तसंच जिल्ह्यातील जनजीवन सुरळीत सुरु आहे. चौकाचौकात पोलीस बंदोबस्त लागू करण्यात आला असून धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

****

राष्ट्रीय युवा दिनाच्या अनुषंगाने आज लातूर इथं नशामुक्त भारत अभियान राबवण्याच्या दृष्टीनं लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना–एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमानं राजर्षी शाहू महाविद्यालयात, प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या सामाजिक, मानसिक आणि शारीरिक दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन केलं.

****

स्वदेशीचा वापर म्हणजे तंत्रज्ञान नाकारणे असं नाही, परंतु आपण तंत्रज्ञानाचे गुलाम होता कामा नये, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं युवा उद्यमी संवाद कार्यक्रमात बोलत होते. तंत्रज्ञान ही अपरिहार्य गोष्ट असल्याचं भागवत यांनी नमूद केलं. उद्योग हा फक्त आपल्या नफ्यासाठी नाही, समाजाच्या भल्यासाठी केला जातो, याकडेही भागवत यांनी लक्ष वेधलं.

****

आकाशवाणीच्या वृत्त विभागातल्या माजी वृत्त निवेदक जयश्री पाटणकर यांचं काल मुंबईत हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. त्या ७० वर्षांच्या होत्या. सुरुवातीला राज्य सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क कार्यालयात काम केल्यानंतर दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या वृत्तविभागात त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ काम केलं.

****